ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २८ फेब्रुवारी, १९५१ अंक ९

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापना: १९२६.

मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,१६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७
हेड ऑफिस:—हायस्कूल रोड, सांगली.
शाखा:—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें ,, | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चेवर |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
सरकारतर्फे :—
मे. भ. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. ज. वि. करमरकर, सराफ.
सोसायट्यांतर्फे :—
मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.
वैयक्तिक समासदांतर्फे :—
मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर. भ. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी
## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.


६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चात मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. ११७३८

**दळणाच्या चक्क्या-टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
**कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.**
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
**केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**


## विविध माहिती

**ताडगुळाच्या उत्पादनाचें केंद्र—** मद्रास सरकारनें तिरुनेवेल्ली जिल्ह्यांतील एका खेड्यांत ताडगुळाच्या उत्पादनाचें केंद्र काढण्यास मंजुरी दिली आहे. गेल्या महिन्यांत दुसऱ्या एका खेड्यांत असेंच केंद्र उघडण्यांत आलें आहे. दोन्ही केंद्रांत मिळून ताडी काढणाऱ्या ५० लोकांना काम पुरविण्यांत आलें आहे. त्यांना सरकारकडून कर्ज आणि इतर साह्य देण्यांत येत आहे. दोन्ही केंद्रें प्रयोगादाखल सुरू करण्यांत आलीं असून त्यावर ८३,००० रुपये खर्च होणार आहेत. तयार झालेला माल विकण्याची व्यवस्थाही करण्यांत आली आहे.

**अपंगांना व वृद्धांना मदत—** वार्धक्य अगर अपंगपणा ह्या कारणामुळें ज्यांना स्वतःचें पोट भरतां येत नाहीं अशांना आर्थिक मदत देण्याचें सौराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या कलेक्टरकडे तीन हजार रुपये सुपूर्त करण्यांत आले आहेत. ह्या रकमेंतून वरील लोकांना दरमहा ३ ते ५ रुपयेपर्यंत भत्ता देण्यांत येईल. ही मदत कांहीं विवक्षित काळापुरती अगर जरूर असल्यास जन्मभरही देण्यांत येणार असल्याचें समजतें.

**करामुळें अनिष्ट परिणाम—** ब्रिटनच्या चेंबर ऑफ कॉमर्सचा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. सरकारी नियंत्रित व्यापार आणि कर ह्यांच्यामुळें ब्रिटनच्या नाविक धंद्यावर अनिष्ट असा परिणाम झाल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे.

**रशिया-अल्बानिआ व्यापारी करार—** सो. रशिआ आणि अल्बानिआ ह्या दोन राष्ट्रांत व्यापारी करार झाला आहे. कराराच्या अटींप्रमाणें रशिआनें अल्बानिआला यांत्रिक साहित्य आणि तंत्रज्ञ ह्यांची मदत द्यावयाची आहे. कराराची मुदत चार वर्षांची आहे. उलटपक्षीं, अल्बानिआ रशिआला कोणता माल देणार आहे तें बाहेर आलेलें नाहीं.

**कोळसा व तांदूळ ह्यांची अदलाबदल—** आसाम सरकार आणि पूर्व पाकिस्तानचें सरकार ह्यांच्यांत ऐनजिनसी देवाणघेवाण करण्याचें ठरलें आहे. आसामकडून १५,००० टन कोळसा घेऊन त्याच्या बदला २०,००० मण तांदूळ पाकिस्तान सरकार देणार आहे. हा व्यवहार उभयतांना सोयीस्कर असून तो सिल्हेट येथें अखेर पुरा करण्यांत येणार आहे.

**बेकारांना पैशाची मदत—** शेतीच्या व्यवसायांतील बेकार मजुरांना कामें देण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें १,१५,००० रुपये मंजूर केले आहेत. दुर्ग, बिलासपूर, जबलपूर आणि बुलढाणा जिल्ह्यांतील बेकार शेतमजुरांना कामें देण्यासाठीं वरील रकमेचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**मँगेनीजची निर्यात—** मँगेनीज हा खनिज धातू निर्यात करून भारताला डॉलर्स मिळवितां येतात. कारवार जिल्ह्यांतून चालू वर्षी १५,००० टन मँगेनीज निर्यात करण्यांत येईल असा अंदाज आहे. गेल्या वर्षी ९,००० टन मँगेनीझ कारवारमधील खाणींतून बाहेर काढण्यांत आलें होतें. रत्नागिरी आणि बेळगांव जिल्ह्यांतही नवीन खाणी खोदण्यांत येत असल्याचें समजतें. ह्या नव्या खाणींचा व्यापारी दृष्टीनें कितपत उपयोग होईल, तें मात्र अजून अनिश्चित आहे.

**८० कारखान्यांचा सरकारी ताबा—** ब्रिटनमधील पोलादाच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण धिमेपणानें चालू आहे. गेल्या पंधरवड्यांत ८० मोठ्या कारखान्यांची आणि १०० छोट्या कारखान्यांची मालकी स्टील कॉर्पोरेशन ह्या सरकारी संस्थेकडे आली. राष्ट्रीयीकरणाच्या कायद्यान्वयें अगदी लहान कारखाने सोडून बाकीच्या सर्व पोलादाच्या कारखान्यांच्या उत्पादनावर परवानापद्धतीनें नियंत्रण ठेवण्यांत येईल. राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेल्या कंपन्यांच्या भागीदारांना सुमारें २३ कोटी पौंड नुकसानभरपाईदाखल देण्यांत येणार आहेत.

**सूर्य-चंद्रांचे आवाज—** सूर्य, चंद्र आणि इतर तारे ह्यांच्यावरील आवाज ऐकविणारा एक प्रचंड रेडिओ टेलिस्कोप उभारण्याचें काम अमेरिकन नाविक दलातर्फे चालू झालें आहे. ह्या टेलिस्कोपच्या उपयोगानें रेडिओच्या साह्यानें करण्यांत येणाऱ्या दळणवळणांत सुधारणा होईल आणि हवेचे फेरफार अधिक निश्चितपणें वर्तवितां येतील अशी अपेक्षा आहे.

**अननुभवी नटी चालेल—** सुप्रसिद्ध अमेरिकन विनोदी नट चार्ली चॅपलिन ह्यानें 'लाइम लाइट' नांवाचा बोलपट काढण्याचें ठरविलें आहे. बोलपटाची कथा, संवाद, संगीत, त्यानें स्वतःच तयार केलें असून दिग्दर्शन व प्रमुख भूमिकाही नेहमींप्रमाणें तोच करणार आहे. ह्या बोलपटांत काम करण्यासाठी एका नव्या नटीची चॅपलिनला आवश्यकता आहे. नटीसाठी दिलेल्या जाहिरातींत पूर्वानुभव नसला तरी चालेल, असें म्हटलें आहे.

**श्री. बखले टाटांचे डायरेक्टर—** भारतीय रेल्वेचे चीफ कमिशनर श्री. के. सी. बखले येत्या मार्च अखेर रेल्वे बोर्डावरून सेवानिवृत्त होणार आहेत. त्यानंतर ते टाटा इंडस्ट्रीजमध्यें डायरेक्टर म्हणून काम करणार असल्याचें समजतें. एअर इंडिआ लिमिटेड आणि एअर इंडिआ इंटर नॅशनल लि. ह्या वैमानिक कंपन्यांचें काम ते पहाणार आहेत, असें म्हणतात.

**दक्षिण भारतांतील रेल्वेज—** भारताच्या रेल्वेमार्गांची पुनर्घटना करण्यासंबंधीं सध्या विचार चालू आहे. रेल्वेच्या सेंट्रल ॲडव्हायजरी कौन्सिलनें साऊथ इंडिअन, एम. एस. एम. आणि म्हैसूर रेल्वेजचें एकत्रीकरण करण्याची योजना मान्य केली आहे. ह्या नव्या पुनर्घटित रेल्वेचें हिंदी नांव 'दाक्षिण रेल्वे' असें ठेवण्यांत येणार आहे.

**ट्रॅक्टर्सच्या दुरुस्तीचीं केंद्रें—** ट्रॅक्टर्स व इतर शेतीचीं अवजारें ह्यांची दुरुस्ती करणारीं ४ केंद्रें मुंबई राज्यांत स्थापन करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या केंद्रांचा उपयोग सरकारतर्फे शेती करणाऱ्यांना व खाजगी शेतकऱ्यांनाही करून घेतां येईल. सर्व केंद्रांना मिळून २० लाख रुपये खर्च येईल. धारवाड, मनमाड, बडोदा व पुणें ह्या चार ठिकाणीं केंद्रें स्थापन केलीं जातील. पुण्याचें केंद्र मध्यवर्ती राहील. वरील रक्कम मध्यवर्ती सरकार कर्ज म्हणून देणार आहे.


—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—साड्यांचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २८ फेब्रुवारी, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे.
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मुंबईच्या अंदाजपत्रकाचें स्वरूप

मुंबई राज्याच्या पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकावर गेल्या चार पांच वर्षांतील परिस्थितीचे व सरकारनें स्वीकारलेल्या धोरणाचे परिणाम स्पष्टपणें दिसून येतात. यंदा कोणत्याहि प्रकारची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष करवाढ सुचविलेली नाहीं ही एक बाबत: स्वागतार्ह गोष्ट आहे. परंतु करवाढ सुचविली नसली तरी सरकारचा विश्वास खुल्या बाजारांत लोकांकडून सुमारें रु. ५ कोटी कर्ज उभारतां येईल, या घटनेवर आहे व यापैकीं रु. २ कोटी कर्ज तापी नदीवरील योजनेसाठी सुरत जिल्ह्यांतूनच प्रादेशिक रीत्या उभारलें जाणार आहे. सरकारनें खर्चाची काटकसर करावयाची शिकस्त चालविली आहे. १९५०–५१ सालीं काटसरीमुळें रु. १ कोटी, ८५ लक्षांची बचत शक्य झाली आहे व पुढील वर्षापासून रु. २ कोटी, ३७ लक्षांची बचत शक्य होणार आहे. परंतु बरीचशी बचत खालच्या श्रेणींतील नोकरवर्ग कमी करून शक्य झाली व होणार असल्यामुळें कांहीं लोकांवर यामुळें बेकारीचा प्रसंग येणार. पैशाच्या टंचाईमुळें मुंबई व पुणें येथील हॉस्पिटल्सवर खर्च व सर्वोदय कलामंदिरावरील खर्च कमी करावा लागणार आहे.

आर्थिक परिस्थिति, वाढत जाणारी महागाई, धान्याचें कमी उत्पादन, घरें बांधण्याची विशेष आवश्यकता, पैशाची टंचाई, नैसर्गिक आपत्ति, या सर्वांचा परिणाम मुंबई राज्याच्या अंदाजपत्रकावर झाला आहे; व नवीन करयोजना नसून रु. ४॥ लाखाची मामुली शिल्लक दाखविणारें अंदाजपत्रक असले तरी ह्या अंदाजपत्रकामागील एकंदर पार्श्वभूमि फार सूचक व बारकाईनें विचार करण्यासारखी आहे. अन्नतुटीच्या प्रश्नाबरोबरच विलीन करण्यांत आलेल्या संस्थानी व तत्सम प्रदेशांचा कारभार, निर्वासितांची सोय, विहीरी व पाणी पुरवठ्याचीं इतर साधनें, शिक्षणावरील वाढता खर्च, विक्री कराच्या बाबतींत नवीन राज्यघटनेमुळें झालेला फेरबदल, मागासलेल्या जातींच्या शिक्षणासाठी व सुखसोईसाठी वाढता खर्च, डांग विभागावर केला जाणारा जास्त खर्च इ. गोष्टींमुळें खर्च आटोक्यांत ठेवणें कठीण झालें आहे व दुसऱ्या बाजूला मुंबई राज्यांतील दर नागरिकामागील कराचा बोजा इतर कोणत्याहि राज्यापेक्षां जास्त असल्यामुळें कोणत्याहि प्रकारें करांचा वाढता बोजा सहन करावयाला सामान्य जनता असमर्थ आहे.

मुंबई प्रांतांतील एकंदर संपत्तीच्या उत्पादनाचें प्रमाण, जनतेची शिल्लक टाकण्याची शक्ति व सरकारला कर्ज देण्याची पात्रता आणि उद्योगधंदे व शेती यांमध्यें जास्त भांडवल गुंतवून संपत्तीचें उत्पादन वाढविण्याची पात्रता या सर्वांवर अंदाजपत्रकाचें यश किंवा रहस्य अवलंबून आहे हें कोणालाहि मान्य होण्यासारखें आहे. सरकारच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत ही गोष्टहि खरी आहे. अंदाजपत्रकांतील आंकड्यांची तोंडमिळवणी साध्य झाली आहे व इतर कांहीं प्रांतांप्रमाणें मुंबईचें अंदाजपत्रक तुटीचें नाहीं ही गोष्ट स्तुत्य आहे. युद्धोत्तर पुनर्घटना फंडांतून गेल्या पांच वर्षांत रु. ७५ कोटी खर्ची पडले आहेत. सरकारच्या शिलकी रकमा घटत चालल्या आहेत, इंपीरियल बँकेकडून कर्जेहि घ्यावें लागत आहे व शेतीचें उत्पन्न प्रत्यक्षांत वाढण्याची विशेष शक्यता दिसत नाहीं. खुल्या बाजारांत मिळूं शकणाऱ्या कर्जावर व मध्य सरकारकडून मिळणाऱ्या मदतीवर सरकारचें यश अवलंबून आहे. ही सर्व पार्श्वभूमि चिंतनीय दिसते.

## रेल्वेची सुधारत जाणारी परिस्थिति

पुढील वर्षासाठीं तयार करण्यांत आलेल्या रेल्वेच्या अंदाजपत्रकामध्यें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या रेल्वेभाड्यांत मैलाला १ पै या प्रमाणें तिकिटांची वाढ करण्यांत आली आहे व यामुळें निदान रु. १७ कोटींचा भुर्दंड तिसऱ्या वर्गाच्या प्रवासी लोकांवर बसणार आहे ही गोष्ट न मानवणारी अशी असली तरी एकंदरींत रेल्वेचें अंदाजपत्रक सुधारत जाणाऱ्या कारभाराची साक्ष पटवितें. अवमूल्यनानंतरची सुधारत जाणारी परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति, कोरियन युद्धाच्या वेळेपासून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळें वाहतुकीला मिळालेली चालना, या गोष्टी रेल्वेच्या कारभाराला व उत्पन्नाला मदत करावयास कारण झाल्या असल्या पाहिजेत. कामगार वर्गाची कार्यक्षमता घटत असल्याबद्दल गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकांत उल्लेख होता. परंतु यंदा रेल्वे–मंत्र्यांनीं कामगारवर्गाच्या कार्यक्षमतेबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. रेल्वेचें भाडें व विशेषत: तिसऱ्या व इंटरच्या उतारूंवरील भाडें वाढवून रेल्वेला सुमारें रु. १९ कोटींचा जास्त पैसा मिळणार आहे. तो सर्व पैसा निरनिराळ्या रिझर्व्ह फंडांत शिल्लक टाकण्यांत येऊन रेल्वेच्या कारभाराची आर्थिक परिस्थिति शक्य तितकी मजबूत करण्यांत येणार आहे, ही स्तुत्य गोष्ट दिसते. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सुखसोईसाठीं यापुढें दरवर्षी रु. तीन कोटी खर्च केले जाणार आहेत. चीफ कमिशनर फॉर रेल्वेज ही जागा रद्द करून रेल्वे बोर्डाची थोडीशी पुनर्घटना करून, व रेल्वेच्या पुनर्रचनेला (regrouping) सुरवात करून खर्चांत काटकसरहि साधली जाणार आहे. यापूर्वी मालाला डबे मिळण्याची पंचाईत पडत असे. परंतु रेल्वेची वहातूक इतकी सुधारली आहे कीं डब्यांनाच आतां मालासाठी वाट पहावी लागत आहे.

रेल्वेजचा कारभार गेलीं दोन वर्षें सुधारत चालला असला तरी नवीन सुधारणा करण्यासाठीं व त्यासाठी लागणाऱ्या भांडवली खर्चासाठीं हिंद सरकारवर अवलंबून रहाणें श्रेयस्कर नसल्यामुळें उतारूंच्या दरांत वाढ करण्यांत येणार आहे असें रेल्वे–मंत्र्यांनीं प्रतिपादलें; हा त्यांचा उद्देश व विचारसरणी रेल्वेकारभाराच्या आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनें योग्य वाटते. सुमारें १७ ते १८ कोटींचें वार्षिक दडपण सामान्य जनतेला सहन करावें लागेल परंतु तें अपरिहार्य आहे. सर्वसाधारण किंमतींत ४०० टक्क्यांवर वाढ झाली असून रेल्वेच्या उतारूंच्या दरांत मात्र ४६ टक्के व मालाच्या दरांत ७६ टक्के एवढीच वाढ झाली असल्यामुळें, व हिंदमधील

रेल्वेचें उतारूंचें भाडें इतर देशांच्या मानानें अगदीं कमी असल्यामुळें सुचविण्यांत आलेली भाड्याची वाढ समर्थनीय आहे असें रेल्वे-मंत्र्यांनीं सांगितलें.

पुढील वर्षी रु. ६६॥ कोटी भांडवली खर्च केला जाईल. यापैकीं १॥ कोटी टाटा इंजिनियरिंग व लोको मोटिव्ह कंपनीच्या भांडवलांत गुंतविले जातील, यंत्रसामुग्री व रोलिंग स्टॉक यासाठीं ३८ कोटी खर्च येईल. मीटर गेजच्या रेल्वेचा कारभार सुधारण्याचे गेल्या वर्षापासून विशेष प्रयत्न करण्यांत येत आहे. चित्तरंजनच्या कारखान्यांत इंजिनें बांधावयास सुरवात झाली आहे, व डबेहि जास्त प्रमाणांत बांधले जात आहेत. रिझर्व्ह फंडांत मार्च १९५२ पर्यंत रु. १६० कोटी, ८८ लक्ष शिल्लक पडतील. मध्य सरकारकडे पुढील वर्षी रेल्वेखात्याकडून रु. ३३ कोटी, ३७ लक्ष जमा केले जातील. याप्रमाणें रेल्वेचा कारभार निश्चितपणें गेलीं दोन वर्षे सुधारत चालला आहे, व आतांपर्यंत शक्य झालेली प्रगति योग्य त्या भांडवली खर्चाची तरतूद करून टिकविली जावी व रेल्वेचा कारभार भरभक्कम पायावर उभारला जावा या हेतूनेंच उतारूंच्या भाड्यांत वाढ केली जाणार आहे. इंजिनांचें बांधकाम, डब्यांचें बांधकाम व इतर सर्व साहित्य या सर्व गोष्टींचें उत्पादन हिंदमध्यें जितक्या लौकर होऊं शकेल तितक्या प्रमाणांत रेल्वेचा कारभार आमूलाग्र सुधारण्यास मदत होईल. रेल्वेमंत्र्यानीं व्यक्त केलेला आशावाद योग्य दिसतो.

---

## औद्योगीकरणः प्रो. मॉरिस डॉब ह्यांचे विचार

सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ प्रो. मॉरिस डॉब ह्यांचें दिल्ली येथील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेतर्फे एक उद्बोधक व्याख्यान नुकतेंच झालें. व्याख्यानाचा विषय 'शेतीप्रमुख देशांच्या औद्योगीकरणासंबंधींचे कांहीं प्रश्न' असा होता. व्याख्यानांतील कांहीं महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे.

प्रो. डॉब म्हणाले, "औद्योगीकरण कशासाठीं करावयाचें? औद्योगीकरणामुळें दरडोई उत्पादनक्षमता वाढते आणि रहाणीचें मान वाढविण्याचा मार्ग खुला होतो. केवळ शेतीप्रधान देशांत ह्या गोष्टी साध्य होत नाहींत; म्हणून औद्योगीकरण करणें जरूर आहे. औद्योगीकरण करण्यासाठीं बऱ्याच मोठ्या भांडवलाची गरज लागेल हें उघड आहे. कारण, शेतीच्या उत्पादनांत दर कामगारामागें जितकें भांडवल गुंतवावें लागतें त्याच्यापेक्षां बरेंच अधिक भांडवल उद्योगधंद्यांतील कामगारामागें गुंतवावें लागतें. औद्योगीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवावें लागतें हें आतां सर्वमान्य झालेलें आहे. हें भांडवल कसें उभारावयाचें? देशांतील एकूण उत्पादन आणि त्यांतील चरितार्थासाठी खर्च होणारें उत्पादन ह्यांच्यांत जो अनुकूल फरक असेल त्यावर भांडवल उभारण्याची शक्यता अवलंबून आहे. देश जितका गरीब, त्या मानानें ही तफावत अथवा 'सेव्हिंग्ज फंड' कमी असतो. परंतु ह्या बाबतींत एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत ठेवला पाहिजे. उत्पादनापैकी जो भाग दैनंदिन चरितार्थासाठी वापरला जातो, तो कमी करून बचत वाढविता येणें शक्य असेल तरच 'बचत फंडा'ला कांहीं अर्थ आहे. ज्या देशांतील ग्रामीण भागांत लोकसंख्या नेहमींच अधिक असते त्या ठिकाणीं अशी बचत शक्य नसते. अशा ठिकाणीं बेकारांना काम देऊन किंवा अनुत्पादक काम करणारांना उत्पादक काम पुरवूनच उत्पादन वाढविता येईल. ह्यावरून असें दिसून येईल कीं, औद्योगीकरणाचा प्रश्न मूलतः द्रव्यविषयक नसून आर्थिक संघटनेचा आहे.

"औद्योगीकरणाच्या वेगासंबंधीं एक आर्थिक कारण सर्वांत अधिक जबरदस्त आहे. ह्या कारणामुळेंच औद्योगीकरणाच्या वेगाला मर्यादा पडते. शेतींत गुंतलेल्या जनतेच्या गरजा भागून किती अधिक धरकट उत्पादन बाजारांत येऊं शकतें त्यावर हा वेग अवलंबून आहे. दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें तर शेतीच्या उत्पादनाच्या वाढीच्या मर्यादा ह्याच औद्योगीकरणाच्या मर्यादा ठरतात. ह्या मर्यादेचें म्हणजेच अडचणींचें निराकरण करणें ही बाब द्रव्यविषयक धोरणाची नाहीं. खेड्यांतील सामाजिक आणि आर्थिक जीवनाची संघटना करणें आणि खेडीं व शहरांतील वस्तुविनिमय वाढविणें हाच प्रगतीचा एक मार्ग आहे. भांडवलवादी आर्थिक स्वातंत्र्याच्या चौकटींत औद्योगीकरणाचा वेग कमी असतो. उलट पक्षीं, ज्या अर्थव्यवस्थेंत मुख्य मुख्य उद्योगधंद्यांवर मध्यवर्ती नियंत्रण असतें अगर त्यांच्यांत सूत्रबद्धता ठेवली जाते, त्या अर्थव्यवस्थेंत औद्योगीकरणाचा वेग अधिक असतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत औद्योगीकरण एका विशिष्ट क्रमानें होतें. तो क्रम असाः— प्रथम शेतीविषयक उद्योगधंदे, नंतर सोपे उद्योगधंदे, आणि शेवटीं अवघड साहित्य लागणारे उद्योगधंदे, हाच क्रम स्वाभाविक आहे असें मात्र नव्हे. रशियानें अवजड उद्योगधंदे आधीं बांधले. पण असें करणें नियुक्त अर्थव्यवस्थेंतच शक्य आहे. नियुक्त अर्थव्यवस्थेंत उद्योगधंद्यांचे निरनिराळे भाग एकमेकांवर पूर्णपणें अवलंबून असतात. सर्व सामाजिक जीवनाचा विचार अशा अर्थव्यवस्थेंत साकल्यानें होत असल्यानें परस्परावलंबी औद्योगिक संबंधांची सूत्रबद्धता मोठ्या प्रमाणावर राबवतां येते. त्यामुळें औद्योगिक विकासानें नवे प्रकार शक्य होतात आणि औद्योगीकरणासाठी द्यावी लागणारी भांडवली किंमतही बरीच कमी होऊं शकते."

---

### शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च

| | १९४८ | १९४९ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| एकूण उत्पन्न | २९·०४ कोटी | २८·६८ कोटी |
| एकूण खर्च | २१·०६ कोटी | २१·१२ कोटी |
| निव्वळ नफा | ८·०७ कोटी | ७·८८ कोटी |
| रोख्यांवरील व्याजाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण | ३४% | २८% |
| कर्जावरील व्याजाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण | ५१% | ५५% |
| व्यवस्था खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण | ३३% | ३६% |
| ठेवीदारांस दिलेल्या व्याजाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण | २४% | २२% |
| एकूण खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण | ७२·५% | ७३·७% |
| निव्वळ नफ्याचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण | २८% | २८% |
| निव्वळ नफ्याचें वसूल भांडवल-रिझर्व्हशीं प्रमाण | १३·४% | १२·९% |
| कराची तरतूद | २·४० कोटी | २·४८ कोटी |
| जनरल रिझर्व्हमध्यें वाढ (निव्वळ नफ्याशीं प्रमाण) | १२·३% | ७·८% |
| डिव्हिडंड बोनसचें निव्वळ नफ्याशीं प्रमाण | २९·६% | ३०·३% |

# सहकाराची खरी ओळख

( पूर्वार्ध )

लेखकः—श्री. मुकुंद पु. दाणी, बी. कॉम्., जळगांव.

कोणत्याश्या सहकारी संस्थेचें निमंत्रण होतें म्हणून मी त्या सभेस हजर होतो. नोव्हेंबरच्या पहिल्या शनिवारीं सहकारी कार्यकर्ते सहकारदिन साजरा करतात आणि याच निमित्तानें होती ही सभा. नेहमींच्या ठराविक रिवाजानुसार सभेला आलेले संदेश, भराभर वाचून दाखविण्यांत आले, नंतर अध्यक्षांच्या खास आग्रहावरून बऱ्याच वक्त्यांनीं नाहीं, हो, करितां प्रथम दोनचार शब्दांची औपचारिक भीड श्रोत्यांना घालून पण बरींच लांबलचक भाषणें केलीं. "वर्गयुद्धानें वर्गकलह कधींच मिटणार नाहींत, तेव्हां भारतानें तरी औद्योगिक प्रगतीसाठीं सहकाराचीच उपासना केली पाहिजे..." एक म्हणाले. "...इंग्लंड, अमेरिका आणि सोव्हिएट रशियांत सुद्धां मानवी मूल्यांचें जतन होण्यासाठी सहकारी तत्त्वांचाच पुरस्कार केलेला आढळून येईल. ..." दुसरे बडबडले.

"...तेव्हां लक्षांत ठेवा! सहकार हाच एक या बिकट परिस्थितींतून तरून जाण्याचा एकमेव मार्ग आहे. ..." तर्कशास्त्रज्ञाच्या तोऱ्यांत तिसऱ्यानीं तारे तोडले. आणि वेळ जात नव्हता म्हणून केवळ तो दवडण्याच्या इराद्यानेंच मी या समारंभाला उपस्थित होतो तरी, चर्मकारापासून शिक्षकापर्यंत, सम्राट अशोकापासून तों गांधी—नेहरूपर्यंत, इतकेंच काय पण ग्रामीण विकासापासून तर विश्वशांतीपर्यंत साऱ्यांचाच संबंध, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, या चळवळीशीं लावण्यांत आल्याचें पाहून मला मात्र तेथें शेवटपर्यंत म्हणजे अगदीं "वन्देमातरम्" होईपर्यंत हजर राहिल्याशिवाय रहावलें नाहीं.

आणि खरोखरच वस्तुस्थिति कांहीं वेगळी नाहीं. सुरवातीला निव्वळ पतीवर कर्ज देणें येवढाच व्यवसाय ही चळवळ हाताळीत होती तरी नंतर तिनें विविध कार्यक्षेत्रांत यशस्वी प्रवेश केला आहे आणि करीतही आहे. सामान्य जनताच काय, परंतु आपले राज्यकर्ते सुद्धां या चळवळीसंबंधीं मोठमोठ्या आशा—आकांक्षा अगदीं प्रथमपासून उराशीं बाळगून आहेत. घटकराज्यांनी आणि केंद्रीय सरकारने निरनिराळ्या विकास योजना याच चळवळीच्या आधारें आखल्या असून नियंत्रणें आणि वाटपासारख्या कांहीं तात्कालिक योजनासुद्धां याच चळवळीच्या आधारें यशस्वी करून दाखविण्यांत येत आहेत. सहकारी चळवळीच्या वाढत्या यशामुळें आणि तिच्या वाढत्या लोकप्रियतेमुळें नियोजन समितीनें सुद्धां तिला आपल्या कार्यांत महत्त्वाचें स्थान दिलें आहे.

परंतु सहकाराचीं तत्त्वें फार चांगलीं आहेत म्हणून तिच्या कार्यपद्धतींत निर्माण झालेल्या आणि वाढूं पहाणाऱ्या कांहीं विघातक दोषांकडेही संपूर्ण दुर्लक्ष करणें, परिणामीं कितपत योग्य होईल याचाही थोडा विचार नको का करावयाला? सहकारी संस्थांचा आकडा दिवसेंदिवस भरमसाठ वाढत आहे, कार्यक्षेत्रही व्यापक झालें आहे, आणि कार्यकर्ते व भांडवलही पुरेशा प्रमाणांत आतां या चळवळीकडे वाहूं लागलें आहे. परंतु यासंबंधी आंकडेवार माहिती चळवळीच्या प्रगतीचें द्योतक म्हणून जरी चळवळीच्या उपासकांकडून पुढें करण्यांत येत असली तरी ही वाढ कशामुळें व कशा स्वरूपाची आहे याची निश्चित कल्पना करून घेतली तर "दुरून डोंगर साजरे" नि "युद्धस्य कथा रम्याः" यांपेक्षां या चळवळीची सद्यः परिस्थिति निदान आपल्या देशांत तरी कांहीं वेगळी आहे असें निश्चयानें सांगणें जरा कठीणच आहे. तत्त्व म्हणून सहकारच काय, परंतु समतावाद, समाजवाद, लोकशाही आणि नाझीशाही सुद्धां सारे कांहीं विशिष्ट परिस्थितींत आपआपल्यापरी आदर्शच आहेत. केवळ तत्त्वच चांगलें आहे म्हणून अनुकूल वा प्रतिकूल परिस्थितींत सुद्धां या चळवळीनें आजवर टिकाव धरला आहे आणि तिची झाली आहे ही वाढ अटळ होती असेंच म्हणावें लागेल. ही वाढ कशामुळें?

युद्धपूर्व काळापेक्षां प्रत्यक्ष युद्धकाळ व युद्धोत्तर काळ या चळवळीस जवळ जवळ सर्वच देशांत पोषक ठरला आहे. युद्धकाळांत निर्माण झालेल्या सामाजिक जीवनांतील अनेक अडचणी दूर करण्यास सहकारी चळवळीनें चांगलाच हात दिला. युद्धोत्तर काळांतही या अडचणी अजून थोड्याफार प्रमाणांत तशाच रेंगाळत आहेत, नव्हे, त्यांत दिवसेंदिवस अधिकाधिक भरच पडत आहे. अशा परिस्थितींत ग्राहकसंस्था (Consumers Societies), गृहसंस्था (Housing Societies) यांसारख्या अनेक आकर्षक स्वरूपांत सहकारी चळवळ सामान्य जनतेच्या सहाय्यार्थ अलिकडे पुढें येऊं लागली आहे. अशाप्रकारें सार्वजनिक जीवनांतील सर्वसामान्य अशी अडचणी दूर करण्याचें महत्त्वपूर्ण कार्यच सहकारी चळवळीनें या काळांत प्रामुख्यानें अंगिकारलें असल्यामुळें सामान्य जनगंगेतील मोठा लोंढा आज या चळवळीकडे सहाजिकच वाहूं लागला आहे.

ही जागतिक युद्धजन्य आणि युद्धोत्तर परिस्थिति इतर देशांइतकीच भारतीय सहकारी चळवळीच्या वाढीला कारणीभूत झाली असली, तरी दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारताला मिळालेलें राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य हें या वाढीचें दुसरें प्रमुख कारण होय. या चळवळीची प्रथम ओळख जरी आम्हाला पाश्चिमात्यांनीच करून दिली असली तरी चळवळीच्या सर्वांगीण प्रगतीच्या आणि उन्नतीच्या दृष्टीनें पद्धतशीर प्रयत्न मात्र तितकेसे त्यांनीं येथें केले नाहींत. औद्योगिक प्रगति, साक्षरता यां सारख्या आर्थिक नि सामाजिक महत्त्वाच्या कार्यांप्रमाणेंच याही कार्याची, नकळत का म्हणाना, त्यांच्याकडून हेळसांड व उपेक्षाच झाली. आतां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र ही परिस्थिति किंचित् बदलली आहे. आपल्या पुढाऱ्यांनीं व राज्यकर्त्यांनीं या बाबतींत जातीनें लक्ष घालण्यास सुरवात केली आहे. जीवनाला अत्यंत आवश्यक असलेल्या गोष्टींची टंचाई, महर्गता नि काळाबाजार यांच्या विरुद्ध लढा देण्यासाठीं सध्या सरकारनें सहकारी चळवळीचें प्रभावी शस्त्र हातीं धरलें आहे. नियंत्रण व वाटपाच्या क्षेत्रांत सहकारी संस्थांना सर्वत्र अग्रस्थान दिलें जात आहे. निर्वासितांच्या पुनर्व्यवस्थेंत तर अशा संस्थांचा बऱ्याच मोठ्या प्रमाणांत उपयोग करून घेण्यांत येत आहे; आणि सहकारी संस्थांना आर्थिक व तांत्रिक सहाय्य देण्यांतही केंद्रीय व प्रादेशिक सरकारांनीं आपले हात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बरेच सैल केले असल्याचें सर्वत्र दृष्टोत्पत्तीस येत आहे. अशाप्रकारें स्वातंत्र्योत्तर या वाढत्या राजाश्रयामुळेंच ही चळवळ अलिकडे जोरकस मूळ धरूं लागली आहे यांत शंका नाहीं.

युद्धोत्तर परिस्थिति आणि राजाश्रय हीं जरी या चळवळीच्या वाढीचीं अलीकडील कारणें असलीं तरी या पूर्वींहो सहकारी चळवळ आपल्या देशांत हळू हळू वाढतच होती. परंतु ही वाढ कांहीं कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थीपणामुळें अथवा सहकारी खात्याच्या तज्ज्ञ मार्गदर्शनामुळेंच होत होती असें नाहीं; तर विशिष्ट राखीव कार्यक्षेत्र, स्वतंत्र सहकारी कायद्याचें संरक्षण, स्वतंत्र खात्याची देखरेख, मार्गदर्शन, सक्तीची हिशोबतपासणी व थोड्या-

बहुत प्रमाणांत मिळणारा राजाश्रय या आणि अशा अनेक कारणांमुळेंच ही प्रगति अटळ होती; किंबहुना ती निव्वळ नैसर्गिक होती.

परकीय राज्यकर्त्यांनीं हें रोपटें या देशांत सहेतुक अथवा निर्हेतुक लावलें अन् तें त्यांनीं तसें लावलें म्हणूनच मिळेल त्या सतपाण्यानें हळू हळू निसर्गाचा नियम आहे म्हणूनच वाढावें तसें वाढत होतें. या व्यतिरिक्त ह्या वाढीला कांहीं विशेष अर्थ होता असें म्हणतां येणार नाहीं, आणि आज तरी या चळवळीची भरमसाट वाढ दिसत असली तरी ही वाढ भरीव व कायम स्वरूपाची आहे असेंही म्हणणें जरा धाष्टर्यचेंच ठरणार आहे. पाटाच्या बांधाबांधानें ओलाव्यामुळें तेथें भाजीपाल्यानें जीव धरावा तद्वतच गत आज तरी या चळवळीची आहे, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. वर सांगितल्याप्रमाणें ही वाढ केवळ अनुकूल परिस्थितीमुळेंच कशी झाली आहे हें लक्षांत घेतलें तर युद्धोत्तर परिस्थिति व राजाश्रय यांचा ओलावा नाहींसा होतांच या भाजीपाल्याचे हाल कुत्रा देखील खाईल कीं नाहीं याबद्दल शंकाच वाटते. विशेषतः ग्राहक सहकारी संस्थांच्या बाबतींत तर ही शंका तज्ज्ञांकडून उघड उघड व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितींत चळवळ ज्या मार्गानें जात आहे त्या मार्गांतील खाचखळगे आधींच भरून काढण्याची काळजी घेतली तर चळवळीला होणारे संभाव्य अपघात तर खचित टळतीलच टळतील आणि तिची वाटचालही बरीच सुकर होईल.

## हे खांचखळगे–

सहकारी चळवळीची भरीव व टिकाऊ वाढ होण्यास मुख्य अडचण अशा संस्थेच्या चालकवर्गाविषयींच आहे. संस्थेचें सर्वांगीण धोरण आंखण्यापासून तों तें हाताखालील नोकराकरवीं हवें तसें राबवून घेण्यापर्यंत सर्वाधिकार याचे हातीं असतात, या दृष्टीनें या वर्गाचें अशा संस्थांच्या कार्यपद्धतींत किती महत्त्वाचें स्थान आहे हें लक्षांत येईल. निस्पृह आणि निस्वार्थी कार्यकर्ता म्हणजे असल्या संस्थांचा गाभा आहे. निस्पृहतेबरोबरच संस्थेविषयीं आपुलकीची भावना, संस्थेच्या कार्याविषयी खरी तळमळ, आणि सखोल ज्ञान, स्वतः जातीनें प्रत्येक काम करण्याची हौस, तसेंच लायक व कर्तबगार नोकरांची पारख, इत्यादि गुण त्यांचे ठिकाणीं असणें आवश्यक आहे. सहकारी संस्थांच्या बाबतींत मात्र असा चालकवर्ग अभावानेंच पहावयास सांपडतो; कारण संस्थेचा नामधारी एकाद्या भाग ( share ) घेतला आणि अनेक लटपटी, खटपटी करून निवडणुकींत बहुमत मिळविलें कीं झाला तो संस्थेचा चालक, मग त्याच्या ठिकाणीं आवश्यक गुण व पात्रता असो वा नसो, हीच पद्धत सर्वत्र रूढ आहे; सकृत् दर्शनी चांगली वाटणारी ही लोकशाही शासनपद्धति संस्थांच्या प्रगतीच्या दृष्टीनें मात्र अत्यंत घातुक ठरली आहे. अलीकडे बऱ्याच सहकारी संस्थांतून आणि नगरपालिकांतून या लोकशाही कारभारामुळें होणाऱ्या अनागोंदी कारभारास हळू हळू वाचा फुटूं लागली आहे. केवळ अव्यवस्थित कारभारामुळेंच अनेक नगरपालिका सरकारजमा झाल्याचें आपण पहातोंच. लोकशाही कार्यपद्धतींत चालकांवर त्यांच्या पात्रतेसंबंधीं कांहीं तरी निर्बंध आवश्यक असल्याचेंच हें सूचक समजावयास हरकत नाहीं, आणि याच हेतूनें लोकसभेंतील लोकनियुक्त सदस्यांच्या बाबतींतही पात्रतेसंबंधीं कांहीं निर्बंध घालण्याबाबत अलीकडे दिल्लींतील राजकीय वर्तुळांत वारे वाहूं लागले आहेत.

Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

कूळ व शेतजमीन कायदा
आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं. ४ रु. कूळकायदा (१९३९) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं. २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या–प्रतिबंधक कायदा (आवृत्ति ३ री) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., खंडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.
पत्ता:–लॉ अँकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

भोर स्टेट बँक लि.
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.
शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंडुके.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.
आधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.

उंची कपड्याचा व स्नानाचा उत्तम साबण निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा

## भारत-पाकिस्तान व्यापाराचा प्रश्न

भारत आणि पाकिस्तान ह्यांच्यामधील व्यापार व्यवहारासंबंधीं बोलणीं नुकतींच संपलीं आहेत. भौगोलिक दृष्ट्या निकटचे हे शेजारी असतांना सुद्धां गेल्या पंधरा महिन्यांत उभयतां राष्ट्रांच्या दरम्यानचा व्यापार पूर्णपणें थांबला होता. गेल्या वर्षी एप्रील आणि सप्टेंबर महिन्यांत ऐनजिनसी देवाणघेवाण करण्याचे जे करार झाले तेच काय ते अपवादभूत होत. भारताचें सरकार अमेरिकेहून गहूं मागवितें; पण शेजारच्या पाकिस्तानकडून धान्य घेण्यास तयार होत नाहीं अशा प्रकारचा प्रचारहि पाकिस्तानकडून करण्यांत येत आहे. तेव्हां सर्वच दृष्टींनीं उभयतां राष्ट्रांत व्यापार चालू व्हावा हें उचित आहे. राजकीय दृष्ट्या भारताची फाळणी झालेली असली तरी फाळणीपूर्वी सर्व भारताची अर्थव्यवस्था अविभक्त पायावर रचलेली होती. अर्थातच भारत व पाकिस्तान ह्यांच्या अर्थव्यवस्था एकमेकांला अंशतः पूरक असल्यास नवल नाहीं. भारताला पाकिस्तानच्या कच्च्या तागाची, गव्हाची आणि तांदुळाची गरज आहे. हा माल देण्यासारखी पाकिस्तानची परिस्थितिहि आहे. परंतु सध्यां पाकिस्तानची आर्थिक परिस्थिति अधिक बळकट आहे. गेल्या सप्टेंबर महिन्यापासून पाकिस्तानच्या कच्च्या मालाला जगाच्या बाजारांत चांगली मागणी येऊं लागली आहे. अगदीं कमी प्रतीचा तागही चांगल्या किंमतीला विकतां येईल असें पाकिस्तान सरकारला वाटत आहे. ह्या मालाला आतांपर्यंत हिंदी गिरण्यांशिवाय दुसरें गिऱ्हाईकच नव्हतें. मागणी वाढती असल्यामुळें पाकिस्तानचें सरकार तात्पुरत्या स्वरूपाचें व्यापारी करार करण्यास उत्सुक नाहीं असें दिसतें.

पाकिस्तानच्या चलनाच्या किंमतीबद्दल पाकिस्तानांत दोन प्रकारचे प्रवाह दृष्टीस पडतात. पाकिस्तानच्या चलनाची सम किंमत पाकिस्ताननेंच ठरवावी असें कांहींचें मत आहे. कांहींच्या मतानें, पौंडासारख्या एखाद्या तिसऱ्याच हुंडणावळीच्या साह्यानें पाकिस्तानच्या चलनाचा भाव ठरविण्यांत यावा. पाकिस्तानच्या कच्च्या मालाला जागतिक बाजारपेठेंत सध्या जो भाव आहे तो लक्षांत घेतां, पाकिस्तानी हुंडणावळीची आंतरराष्ट्रीय किंमत वाढेल, असा ह्या मताच्या लोकांचा अंदाज असावा. तशी ती वाढल्यास भारतालाही अधिक किंमती द्याव्या लागूनच पाकिस्तानचा माल घ्यावा लागेल. सध्या चालू असलेल्या वाटाघाटींत उभय राष्ट्रांच्या चलनाच्या किंमतींचें प्रमाण काय असावें हाच मुख्य प्रश्न आधीं सोडवावा लागेल. पाकिस्तानची आजची आर्थिक भरभराट ही कांहीं कायम स्वरूपाची नाहीं. आंतरराष्ट्रीय बाजाराची परिस्थिति सध्या पाकिस्तानला अनुकूल असली तरी कधी तरी ती प्रतिकूल होण्याचा संभव व्यापारी निरीक्षकांना दिसत आहे. तशी वेळ आल्यावर पाकिस्तानला कोळसा, कापड, इत्यादि माल भारताकडूनच घेणें फायद्याचें ठरेल. पाकिस्तानी रुपयाचा सध्याचा हुंडणावळीचा दर भारत सरकार मान्य करणार असल्याची वार्ता आहे. पाकिस्तानने आपल्या चलनाची किंमत उतरविलेली नसल्यानें त्या राष्ट्राच्या चलनाचा सध्याचा दर मान्य करणें भारताच्या हिताचें नाहीं. परंतु भारतांतील उद्योगधंद्यांची आणि अन्नधान्यविषयक परिस्थिति लक्षांत घेता, तात्पुरत्या स्वरूपाचे अल्पकालीन व्यापारी करार करून आर्थिक तंगीचा ताण कमी करणेंच हिताचें ठरेल. भारत व पाकिस्तान ह्यांच्यामधील व्यापाराला आगबोटीसारख्या वहातुकीच्या साधनांची अडचण नाहीं; परदेशांतून येणारा आवश्यक कच्चा माल व अन्नधान्य बोटी मिळण्यावर अवलंबून आहे. शिवाय दूरच्या सामुद्रिक वहातुकीला येणारा खर्चही विचारांत घेतला पाहिजे.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



(स्थापना १९१८)

बचतीच्या विविध योजना

हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

शाखा : दादर, माहीम, बेळगांव


## दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव

दि बँक ऑफ सिटिझन्स् लिमिटेडचा ३१ डिसेंबर, १९५०० अखेरचा अहवाल व ताळेबंद पत्रक आमचेकडे आलें आहे. हें पत्रक पाहिल्यावर बँकेची गेल्या वर्षीत झालेली कामगिरी व प्रगति पाहून, ती अभिनंदनास पात्र आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. बँकेचे एकंदर वर्किंग फंडस् साल अखेर ३८,६२,००० रु. वर झाले आहेत. मागच्या वर्षापेक्षां फिक्सड डिपॉझिट, सेव्हिंग्ज् व करंट अकाउन्टस् रकमेंत बरीच वाढ झालेली असून, त्याच प्रमाणें नफातोटा पत्रकांतही या वर्षी बँकेला निव्वळ नफा २५,००० रु. वर झालेला आहे. मागील ३ वर्षांचा सर्व तोटा भरून काढून व रिझर्व्ह फंडांत २,७१० रु. ची भर घालून शेअर होल्डर्संना ३ टके करमाफ डिव्हिडन्ड डायरेक्टर्स बोर्डानें सुचविलें आहे.

या वर्षी बँकेचे डायरेक्टर-इन-चार्ज श्री. जी. डी. सराफ हे असून, श्री. ए. ए. बंदुकवाला हे चेअरमन व श्री. व्ही. एम. पाटकर हे जनरल मॅनेजर आहेत.

या बँकेची अशीच भरभराट होऊन ती ह्या भागांतील व्यापारी वर्गाच्या अडीअडचणी नाहींशा करण्यास आणखी समर्थ होवो अशी आम्ही इच्छा करितों.

### ३१-१२-५० चा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,५०,००० | रोख व इतर बँकांत | ६,५२,०४३ |
| रिझर्व्ह फंड | १,००,७०० | बिल्स | ३,०६,२९९ |
| ठेवी व बँकांची देणीं | ३२,३०,४८७ | इनव्हेस्टमेंटस | १२,१५,७४९ |
| | | कर्जें | १५,४१,४४६ |
| चालू वर्षाचा नफा | २५,२७० | | |

## डायरेक्टर-मॅ. एजंट यांच्या सह्या यांत्रिक पद्धतीनें करणार

ग्रेट ब्रिटन, अमेरिका इ. देशांत शेअर सर्टिफिकिटांवर कंपन्यांच्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या सह्या करण्याची यांत्रिक पद्धति अंमलांत आहे. तिचें अनुकरण करण्याचा अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी कं. लि. चा विचार आहे. शेअर सर्टिफिकेटावर हजारों सह्या करण्यांत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वेळ निष्कारण खर्च होतो. त्याचा अधिक चांगला उपयोग करतां येणें शक्य असतें. ह्यापुढें शेअरसर्टिफिकेटावरील डायरेक्टर व मॅनेजिंग एजंटस ह्यांच्या सह्या यांत्रिक पद्धतीनें करण्याची सवलत देणारी कंपनीच्या आर्टिकलमध्यें दुरुस्ती एका स्पेशल ठरावान्वयें करण्यांत येणार आहे. ह्या नव्या पद्धतीनें केलेल्या सह्यांचे खालीं कंपनीचा शेअर रजिस्ट्रार किंवा त्याचा दुय्यम अधिकारी सही करील. यांत्रिक पद्धतीनें छापल्या जाणाऱ्या सह्या डायरेक्टर व मॅ. एजंट यांचे समोरच छापल्या जातील.

संसदेंत.........

## आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

डॉलर गंगाजळींत १९५० मध्यें भर पडली असून भारताला डॉलर देशांतील आवश्यक असलेला माल खरेदी करावयास आतां रकमेची अडचण नाहीं.

× × ×

दिल्लीच्या तयार घरांच्या कारखान्याबाबतच्या मुळगांवकर समितीच्या अहवालाचा सरकार विचार करीत असून त्यांतील शिफारशी प्रसिद्ध करणें सार्वजनिक हिताचें नाहीं.

× × × ×

सांमुदायिक खरेदी हाच कपाशीचे दर काबूत ठेवण्याचा एकमेव मार्ग आहे. कापसाच्या कमाल किंमतींत वाढ करण्याचा सरकारचा विचार नाहीं

× × × ×

भारत सरकारनें अन्नधान्याबाबत द्यावयाच्या आर्थिक मदतीच्या धोरणांत बदल करण्यांत आला आहे. ही आर्थिक मदत यापुढें कांहीं औद्योगिक केंद्रें व शहरें एवढ्यापुरती मर्यादित स्वरूपाची राहील. असें असून सुद्धां १९५०–५१ मधील रु. २४·७७ कोटी ऐवजीं १९५०–५१ मध्यें रु. २१·३२ कोटी खर्च यापायीं करावा लागेल. इतरत्र धान्याच्या किंमतींत वाढ होईल खरें, पण खर्च लक्षांत घेतां सरकार ती जबाबदारी घेऊं शकत नाहीं.

परदेशी धान्याच्या किंमती वाढल्या आहेत. वहातुकीस भरपूर बोटी नाहींत, म्हणून धान्य मिळण्यास विलंब लागत आहे. वहातुकीच्या दरांतही वाढ झाली आहे.—अमेरिका ५७ टक्के, ऑस्ट्रेलिया ९५ टक्के, अर्जेंटायना १४२ टक्के.

अमेरिकेकडून धान्य मिळविण्याबाबत बोलणीं चालू आहेत. रशियानें धान्य देऊं केलेलें नाहीं.

× × ×

१९५१ मध्यें भारत सरकारनें निरनिराळ्या राज्यांना द्यावयाच्या धान्याचा तपशील (हजार टनांत)

मुंबई ७००, बिहार ६००, मद्रास ४००; प. बंगाल ४००, त्रावणकोर-कोचीन ३२५, मध्य प्रदेश २५०, उत्तर प्रदेश २००, दिल्ली १९६, हैद्राबाद ७५, म्हैसूर ७५, सौराष्ट्र ५०, कच्छ २०, काश्मीर २०, आसाम २४, ओरिसा, १०, इतर २५०

× × × ×

खत–खरेदी व्यवहारांतील अनागोंदीच्या कारभाराबद्दल प्रमुख सरकारी अधिकाऱ्याला नोकरीवरून काढून टाकण्यांत आलें आहे. थोडक्यांत हकीकत अशी.

खत–खरेदीची परवानगी—एक वर्षापुरती, ४,००,००० टन.

प्रत्यक्ष व्यवहार—दीड वर्षाचा.

प्रत्यक्ष खरेदी— ५,४८,००० टन.

किंमत— रु. १६,८९,६३,३००.

आज पडून असलेलें खत—१,७०,००० टन.

× × × ×

गेल्या सहा वर्षांत ९ विमा कंपन्या बुडाल्या.

× × × ×

भारत संसदेच्या ४२ सभासदांनीं अमेरिकन संसदेच्या सभासदांना १९ कोटी डॉलर्सचें २० लक्ष टन धान्य बिल संमत करण्याबद्दल तारेनें विनंती केली. भारत पंतप्रधानांनीं या प्रकाराबद्दल नापसंती दर्शविली. तथापि ही घटना अन्नप्रश्नाच्या कठीण समस्येची निदर्शक, आणि अंतर्गत उत्पादन व सरकारी प्रयत्न

स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २–०–० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

(मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित)

दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

(स्थापना : १९२९)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर (जि. धारवाड).

★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज (पे ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.

के. डी. शिराळकर मॅनेजर

त्याबद्दल अपुरेपणा व असमाधान आणि असाहाय्यता दाखविणारी आहे.

केंद्र सरकारजवळील धान्याचा साठा जानेवारी १९५० मध्यें १६ लक्ष टन होता तो जानेवारी १९५१ मध्यें ७ लक्ष टनाहूनही कमी झाला ! रेशनमध्यें २५ टक्के तात्पुरती कपात करण्यांत आल्यावर फेब्रुवारींत तो साठा ८·८ लक्ष टन झाला. मार्च अखेर तो १२ लक्ष टन व्हावा अशी अपेक्षा आहे.

१९५१ मध्यें रु. १६० कोटी खर्च करून ३७ लक्ष टन धान्य परदेशांतून आणण्याची योजना आहे. मुख्य अडचण पैशांची व वहातुकीच्या साधनांची. आहे. अधिक धान्य कसें आणतां येईल याचा विचार चालू आहे. एकूण तूट ६० लक्ष टन धान्याची आहे.

पाकिस्तानांत गव्हाचा भाव मणीं रु. ७-८ आहे, तेथील गहूं मिळाल्यास तो आणण्याबाबत बोलणीं सुरू आहेत.

चीनशीं ५०,००० टन धान्याचा करार केलेला असून आणखी कांहीं धान्य मिळविण्याची खटपट चालू आहे. त्या बदली चीनला पोतीं हवीं आहेत.

रशिया भारताला तांदूळ खावयास तयार असल्याचें वृत्त रशियन वकिलातीनें प्रसिद्ध केलें आहे.

देशांतील धान्याची वसुली अपेक्षित ४९.१२ लक्ष टन, प्रत्यक्ष ४६·३४ लक्ष टन.

पूर्वी परदेशी धान्याचे दर महाग होते. म्हणून सरकारी मदत देऊन तें धान्य स्वस्त करून विकण्यांत येत असे. आतां देशी धान्य अधिक महागलें आहे. बरें, तरीहि मदत करावयाची तर रु. ४० कोटी खर्च होईल. एवढा खर्च करण्यास सरकार असमर्थ आहे. म्हणून निरनिराळ्या राज्यांना देण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतींत कपात करण्यांत आली आहे.

१९५० मध्यें खरेदी केलेल्या ६० हजार टन परदेशी साखरेपैकीं २० हजार टन आली असून बाकी ४० हजार टन या वर्षी हातीं येतील. त्याव्यतिरिक्त अधिक परदेशी साखर आणण्याचा सरकारचा विचार नाहीं.

१९५१ मध्यें गेल्या वर्षापेक्षां देशांतील साखर उत्पादन अधिक होईल अशी अपेक्षा आहे.

× × × ×

मार्च १९५० अखेर स्टर्लिंग गंगाजळीची शिल्लक रु. ८५८ कोटी. १ डिसेंबर १९५० अखेर शिल्लक रु. ८३४ कोटी.

× × × ×

सरकारी कारखान्यांचें रूपांतर हळूहळू लिमिटेड कंपन्या वा कॉर्पोरेशन यांत करण्याचें ठरलें आहे.

सरकार व्यतिरिक्त इतरांचें भांडवल यांत असणार नाहीं.

सरकार वेळोवेळीं सूचना देईल व डायरेक्टर बोर्डावर असलेले सरकारी अधिकारी यांचे मार्फत कंपन्याचे कारभार पाहील. विशेषतः आर्थिक व्यवहारांत लक्ष ठेवील.

× × ×

परदेशी पाठविलेल्या कापडासंबंधीं पुढील स्वरूपाच्या तक्रारी आल्या आहेत. (१) नमुन्याबरहुकूम माल नाहीं—माल कमी प्रतीचा. (२) कापडाची प्रत्यक्ष लांबी छापलेल्या लांबीपेक्षां कमी. (३) सदोष रंगकाम. (४) विलक्षण सदोष विणकाम. (५) "शिपिंग सॅंपल्स" कधींच पाठविलेलीं नसावयाचीं. (६) गांठ—पॅकिंग असमाधानकारक. (७) अनावश्यक मजकूर आणि गिचमिड अक्षर यामुळें माल जागेवर पोंचण्यांत अडचणी. (८) जाडे-भरडे आणि मध्यम- प्रतीचे कापडाचे दरांत व्यापाऱ्यांकडून वाढ.


## दी आदर्श कृषि संस्था लि. धुळें.

(प. कान्हदेश)

(स्थापना सन १९४५)

★ गेल्या तीन वर्षांत ६%, ६% व ८% नफा शेअर होल्डरास देण्यांत आला. प्रतिवर्षी नफ्याचें प्रमाण वाढतच आहे.

★ बागायत व दुग्ध व्यवसायाकरतां चार लक्ष रुपये भांडवल जमा करावयाचें आहे. शेअर्सची विक्री चालू आहे. एका शेअरची किंमत रु. २५/-. एका इसमास कितीही शेअर्स घेतां येतात.

★ संस्था मुदत ठेवी स्वीकारते. व्याजाचे दर द. सा. द. शें. ६, ६½ व ७. मुदत १२, १८ व २४ अगर अधिक महिने

★ माहितीपत्रकें व फॉर्म्स खालील ठिकाणीं मिळू शकतील:—

(१) दी बॉंबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बॅंक लि. मुंबई व सर्व शाखा.

(२) दी न्यू सिटीझन बॅंक ऑफ इंडिया लि. मुंबई व सर्व शाखा.

(३) पुणें, अहमदनगर व बेळगांव या जिल्ह्यांतील डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅंकांच्या मुख्य कचेऱ्या व सर्व शाखा.

(४) मुंबई राज्यांतील सर्व तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स.

(५) मुंबई राज्यांतील सर्व तालुका कॉंग्रेस कमिटीज्.

द. वि. जावडेकर
मॅ. डायरेक्टर.

## बॅंक ऑफ पूना लि.

शेड्यूल्ड बॅंक

वसूल भांडवल .... .... रु. १२,५०,०००

बॅंकेच्या प्रगतीचे आकडे

| | १९४६ | १९५० |
|---|---|---|
| खातेदार | ९५५ | ३,२७९ |
| ठेवी | ९,५३,००० | २४,९०,००० |

या दाखल्या ठेवीदारांना वाढतें व्याज मिळून शिवाय अनेक धंद्यांना सहाय्य करतां आलें. आपला सर्व व्यवहार या बॅंकेमार्फत करा. चालू, सेव्हींग व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

— व्याजाचे दर —

चालू अर्धा टक्का, सेव्हींग १॥ टक्के.

मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, तीन वर्षे ३ टक्के

जास्त मुदतीच्या ठेवीकरतां मुख्य ऑफिसकडे चौकशी करावी.

शाखा: (१) भवानी पेठ, पुणें २. (२) सदाशिव पेठ, पुणें २. (३) टिळक चौक, सोलापूर. (४) वखार भाग, सांगली.

मुख्य ऑफिस रविवार पेठ, पुणें २.

गो. ग. साठे, मॅनेजर.

## औषधी व तत्सम कारखान्यांच्या अडचणी

### मराठा चेंबरची विनंति

मुंबई राज्यांत दारूबंदी कायदा जारी होऊन बरेच दिवस झाले असल्यानें त्या कायद्यामुळें औषधी व तत्सम कारखानदारांना उत्पादनाच्या कामीं कोणत्या अडीअडचणी येत आहेत याची माहिती मिळविणें आतां शक्य झालें आहे. यासाठीं मराठा चेंबरनें या बाबतींत एक प्रश्नावलि काढून ती. संबंधित कारखानदारांना पाठविली आहे. भारत सरकारनेंहि प्रस्तुत प्रकरणीं चौकशी करण्यासाठीं एक अबकारी तज्ज्ञ समिति नेमिली आहे. म्हणून चेंबरच्या प्रश्नावलीचीं उत्तरें कारखानदारांनीं शक्य तितक्या लौकर पाठविल्यास त्याबाबत योग्य ती तजवीज करणें सुलभ होईल. ज्यांना प्रश्नावलि मिळाली नसेल त्यांनी ती त्वरित मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें २ यांजकडून मागवून घ्यावी.

### महाराष्ट्र बँकेचें ५% करमाफ डिव्हिडंड

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची १६ वी साधारण सभा रविवार दि. २५ फेब्रुवारी रोजीं भरली होती. सभेनें १९५० अखेरचा ताळेबंद वगैरे मंजूर करून ५% करमाफ डिव्हिडंडला मान्यता दिली. निवृत्त होणारे डायरेक्टर श्री. धों. कृ. साठे, श्री. श्री. गो. मराठे व श्री. मा. वी. शहा ह्यांची फेरनिवडणूक झाली. श्री. गो. द. आपटे व मेसर्स कुलकर्णी आणि खानोलकर ह्यांची ऑडिटर्स म्हणून फेरनेमणूक झाली. अध्यक्ष, श्री. साठे ह्यांनीं आपल्या भाषणांत बँकेची प्रगति निवेदन केली. इतर कित्येक बँकांच्या अनुभवास ठेवींत घट येत असली तरी महाराष्ट्र बँकेकडील ठेवी वाढतच आहेत, ह्याचें रहस्य त्यांनीं सांगितलें. अहवालाचे वर्षी बँकेचें खेळतें भांडवल २ कोटी, ७२ लक्ष रु. वर गेलें असून ताळेबंदास ओढलेला नफा २,२९,६०१ रु. आहे. नफावाटणीनंतर रिझर्व्ह व कॉटिंजन्सी फंड ४,६७,००० रु. होईल. वसूल भांडवल १६,००,००० रु. आहे.

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

१९५० अखेर संपलेल्या वर्षीं ह्या शेड्यूल्ड बँकेचें खेळतें भांडवल ८० लक्ष, ८३ हजार रुपयांवरून ८२ लक्ष, २५ हजार रुपयांवर गेलें आणि नफा ९३,७२९ रु. उरला. इनकम-टॅक्ससाठी ४० हजार रुपये आणि बुडीत कर्ज रिझर्व्हसाठी ५ हजार रुपये बाजूस काढून, रिझर्व्ह फंडांत १०,४७५ रुपयांची भर टाकून ६% करमाफ डिव्हिडंडसाठी ३७,५०० रुपयांचा विनियोग डायरेक्टरांनीं सुचविला आहे. श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी. हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. १९४० ते १९४९ च्या प्रगतीचा कल्पना देणारा एक तक्ता रिपोर्टास जोडण्यांत आला आहे.

#### बँकेचा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ६,००,००० | रोख | १३,२२,५५४ |
| रिझर्व्ह फंड | १,४१,७५४ | डिस्कौंट व खरेदि-केलीं बिलें | १४,९७,२६१ |
| ठेवी, इ. | ५८,५१,७४४ | इनव्हेस्टमेंटस् | १७,६८,८३० |
| इतर बँकांचीं कर्जें | ८,७८,७४३ | कर्जें | ३०,२२,५२० |
| निव्वळ नफा | ४७,३३१ | | |

### दि बँक ऑफ कराड लि. ची सातारा शाखा

दि बँक ऑफ कराड लि., कराडनें, सातारा येथें सोमवार दि. २६ फेब्रुवारी रोजीं आपली शाखा सुरू केली. त्यानिमित्त बँकेच्या ह्या नव्या ऑफिसमध्यें पानसुपारी समारंभ करण्यांत आला. नव्या शाखेचा पत्ता "१५३ भवानी पेठ, रांगोळे ह्यांचा वाडा, सातारा शहर" असा आहे.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाची पुणें कँप शाखा

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मुंबई नें २४३० ईस्ट स्ट्रीट, पुणें कँप येथें आपली नवी शाखा सोमवार दि. २६ फेब्रुवारी रोजीं सुरू केली.

## बँकांच्या कचेऱ्यांची लोकसंख्येवार वर्गवारी, १९४९

| लोकसंख्या | ठिकाणांची संख्या | इंपीरिअल बँक | इतर हिंदी शेड्यूल्ड बँका | परदेशांत नोंदलेल्या शेड्यूल्ड बँका | एकूण शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका | सहकारी बँका | एकूण बँका | प्रत्येक कचेरीशीं लोकसंख्येचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०,००,००० वर | २ | १३ | २३४ | ३६ | २८३ | ७९ | ५१ | ४१३ | ८,७१४ |
| ५ लक्ष ते १० लक्ष | ४ | १० | १७५ | २० | २०५ | ३९ | २२ | ३६६ | १०,२३९ |
| २ लक्ष ते ५ लक्ष | १४ | २४ | २४२ | ९ | २७५ | ५६ | ४६ | ३७७ | ११,१२३ |
| १ लक्ष ते २ लक्ष | ३० | २८ | २५८ | १ | २८७ | १३० | ३३ | ४५० | ९,१०१ |
| ¾ लक्ष ते १ लक्ष | १७ | १६ | ९५ | २ | ११३ | ६७ | २० | २०० | ७,२७२ |
| ½ लक्ष ते ¾ लक्ष | ६५ | ५१ | २६१ | १ | ३१३ | १४० | ५० | ४०३ | ७,६५१ |
| ¼ लक्ष ते ½ लक्ष | १६८ | ७१ | ३४२ | २ | ४१५ | २०५ | ८२ | ७०२ | ८,०६१ |
| १० ह. ते २५ ह. | ४१७ | १०१ | ४८१ | ३ | ५८५ | ३८६ | १६६ | १,१३७ | ६,१०७ |
| ५ ह. ते १० ह. | ३६४ | ४० | २१३ | — | २५३ | २१९ | ५४ | ५६६ | ४,६६५ |
| ५ ह. पेक्षा कमी | २१५ | १६ | ८५ | — | १०१ | १३१ | ४३ | २८३ | २,३०१ |
| एकूण | १,३७६ | ३७० | २३८६ | ७४ | १,८३० | १,४६० | ६०७ | ४,८९७ | ७,४९० |
| इतर ( ज्या ठिकाणची लोकसंख्या निश्चित माहीत नाहीं ) …… | १५० | ७ | २६ | १ | ३४ | ११२ | २२ | १६८ | |
| एकूण | १,५२६ | ३७७ | २,४१२ | ७५ | १,८६४ | १,५७१ | ६२९ | ५,०६५ | |

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए.यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.